लोकमत

# केंद्रीय आयुक्तांकडून मोखाबर्डीची पहाणी

## उपसा सिंचन योजना सिंचनासाठी सज्ज : उद्घाटनाची प्रतीक्षा कायम

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवापूर** : मोखाबर्डी उपसा सिंचन योजना सिंचनासाठी सज्ज असून पहिल्या टप्प्यात ४५७८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यास शासन व प्रशासनाला यश आले आहे. केवळ उद्घाटनाची तेवढी प्रतीक्षा कायम आहे. बुधवारी केंद्रीय जलसंसाधन विभागाचे आयुक्त के. व्होरा यांनी मोखाबर्डी योजनेला भेट देत पहाणी केली.

यावेळी केंद्रीय जल संसाधन आयोगाचे संचालक रायपुरे, गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता अरुण कांबळे, अधीक्षक अभियंता प्रसाद नार्वेकर आदी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय आयुक्तांनी मोखाबर्डी पंप हाऊस व कालव्याची पाहणी केली. मोखाबर्डी योजनेची सिंचन क्षमता २८२३५ हेक्टर असून पवनी तालुक्यातील ११ गावे, भिवापूर तालुक्यातील ५० गावे, चिमूर तालुक्यातील १०५ गावे अशा एकूण ११६ गावातील शेतक ऱ्यांनाया योजनेंतर्गत सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सध्या पूर्णावस्थेतील मोखाबर्डी योजनेंतर्गत ४५७८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. या योजनेव्दारे १५०० एचपीच्या १५ पंपाव्दारे ४० मिमी उंचीवर गोसेखुर्द धरणातील पाणी उचलण्यात येणार आहे. २७०० मिमी व्यासाच्या प्रत्येकी ४.४७ किमी लांबीच्या तीन लोखंडी उर्ध्वनलिकेतून पाणी वितरण कुंडात सोडण्यात येणार आहे. तेथून पुढे ४४.४५ किमी लांबीचा मुख्य कालवा व त्यावरील वितरण प्रणालीव्दारे पवनी, भिवापूर व चिमूर तालुक्यातील १६६ गावातील २८२३५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. केंद्रीय जल आयोगाने या सुधारित किमतीस 'फास्ट ट्रॅक' प्रणाली अंतर्गत समाविष्ट करुन सुधारित प्रशासकीय मान्यता दिली.



प्रकल्पाची पाहणी करतांना केंद्रीय जलसंसाधन विभागाचे आयुक्त के. व्होरा, केंद्रीय जल संसाधन आयोगाचे संचालक रायपुरे, अरुण कांबळे आदी.

गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता अरुण कांबळे यांनी यावेळी प्रकल्प व योजने विषयी सखोल माहिती दिली. यांत्रिकी अधीक्षक अभियंता मडामे, आंभोरा उपसा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता संजय बानखडे आदी अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

2018-10-25 10:30

## Translation

### Commissioner of Central Govt. visits Mokhabardi LIS

(Lokmat, Nagpur edition; Dated 18 Oct 2018)

Mokhabardi LIS is ready for irrigation and 4578 ha. of irrigation potential has been created by the WRD (Govt. of Maharashtra). It is waiting for inauguration. On Wednesday, Shri K. Vohra, Commissioner of Central Water Resources Department visited the LIS and inspected the works of the LIS.

At the time, Raipure, Director, CWC; Arun Kamble, Chief Engineer of the project; Prasad Narvekar, Superintending Engineer and many other officers were also present. The Commissioner visited the Pump House of Mokhabardi LIS and the canal. The LIS has irrigation potential of 28235 ha. and will provide irrigation to 116 (actually 166) villages which includes 11 villages of Pauni tehsil, 50 villages of Bhivapur tehsil and 105 villages of Chimur tehsil. The LIS is nearing completion and irrigation potential of 4578 ha. has been created till date. ........